दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १०४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.१४ जुलै २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

पेण तालुक्याला पावसाने झोडपले ; तीन ठिकाणी घरांच्या भिंती कोसळल्या

दै.रायगड नगरी । पेण

भारतीय हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार कोकणासह रायगड जिल्ह्यात जोरदार पाऊस पडणार आहे. गेल्या तीन दिवसांपासून पेण तालुक्याला पावसाने झोडपले असून अनेक ठिकाणी पावसाचा जोरदार तडाखा बसला आहे. तर अनेक ठिकाणी पूरसदृश्य स्थिती निर्माण झाली आहे. तीन ठिकाणी घरांच्या भिंती कोसळल्या आहेत.

मुसळधार पावसामुळे पेण तालुक्यासह शहरातील अनेक भागात पाणी साचून राहिल्याने नदी, नाले तसेच शहापाडा धरण ओसांडून वाहू लागला आहे. त्यामुळे नदीकिनारी असणाऱ्या गावांना प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. त्यातच पेण शहरातील पिरडोंगरी येथे एका घराची भिंत कोसळली आहे. तर वाशिवली करंबेली येथे गुरांचा गोठा पडला आहे. तसेच करोटी येथे घरांच्या भिंती कोसळल्या आहेत.

रायगड जिल्ह्यात जुलैच्या सुरूवाती पासून पावसाने चांगली सुरुवात केल्यामुळे शेतकरी सुखावला होता, शेतात टाकलेले भात रोपे या पावसामुळे आता चांगले येणार याचाच आनंद शेतकरी वर्गात झाला होता. मात्र येत्या तीन दिवसापासून पावसाने

जोरदार हजेरी लावल्यामुळे शहरातील एसटी स्थानक, कोळीवाडा, चिंचपाडा, विठ्ठल आळी, कारमेल स्कुल महाडीकवाडी, पामबीच रोडसह तालुक्यातील अंतोरे, खरोशी, तांबडशेत आदिं गावांमध्ये शेतीसह रस्त्यावर पाणी मोठ्या प्रमाणावर भरल्याने तालुक्यात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

पुढील काही दिवस पावसाचा आणखी जोर वाढणार असल्याने खाडी किनारी असणाऱ्या खरोशी, दुरशेत, बळवली, दादर, रावे, भाल, सोनखार, खारपाडा आदी गावातील नागरिकांनी सतर्क राहावे असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

सर्वात अधीक पाऊस पेण तालुक्यात झाला आहे. गेल्या चोवीस तासात पेण मध्ये ९६ मिलिमिटर पाऊस पडला आहे. तालुक्यातील करोटी येथे बारक्या पवार यांच्या घराची भिंत कोसळली आहे. तर वाशिवली येथे सुनील पवार यांच्या गुरांचा गोठा कोसळला आहे. तर शहरातील पिरडोंगरी येथे घराची भिंत कोसळली आहे.

थोडा काळ थांबा, उद्धव ठाकरे यांनाच पुन्हा मुख्यमंत्री करावं लागेल : आ.जयंत पाटील

दै.रायगड नगरी । मुंबई

शिवसेनेच्या आमदारांनी विधानसभा अध्यक्षपद निवडणूक आणि विश्वासदर्शक ठरावावेळी व्हीप झुगारून मतदान केले आहे. आता सर्वोच्च न्यायालय या सगळ्याचा निवाडा करण्यासाठी खंडपीठ नेमणार आहे. येत्या तीन-चार महिन्यांमध्ये या सगळ्याचा निकाल लागेल. त्यानंतर राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्यावर उद्धव ठाकरे यांनाच पुन्हा मुख्यमंत्री करण्याची वेळ येईल, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले.

शिवसेनेच्या आमदारांनी पक्षाचा व्हीप झुगारून मतदान केलेले आहे. त्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठामध्ये होईल. त्यासाठी खंडपीठाची नेमणूक हीच सर्वोच्च न्यायालयाची कृती अतिशय गंभीर आहे. विधीमंडळात जे काम झाले आहे, ते सर्वोच्च न्यायालयाने अतिशय गांभीर्याने घेतले आहे, हा त्याचा संदेश असल्याचे जयंत पाटील यांनी म्हटले. सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायमूर्तींची नियुक्ती झाल्यावर या खंडपीठाचे कामकाज सुरु होईल. त्यातून या सगळ्याचा उलगडा होईल. त्याला काही काळ लागेल, मात्र देर है अंधेर नही है. असे जे म्हणतात ते सर्व यामध्ये घडेल. हा निकाल लागल्यावर पुन्हा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनाच मुख्यमंत्री करण्याची वेळ राज्यपालांवर येईल, असा दावा जयंत पाटील यांनी केला.

देशातील भाजपविरोधी पक्षांनी एकत्र येत राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत यशवंत सिन्हा यांना रिंगणात उतरवले होते. महाराष्ट्रातील सत्तापालटापूर्वी शिवसेना महाविकास आघाडीसोबत जाऊन यशवंत सिन्हा यांना मतदान करेल, अशी आशा होती. मात्र, उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी भाजपच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा जाहीर केला होता. यावरुन वादंग निर्माण झाला होता. जयंत पाटील यांनी राष्ट्रपती निवडणुकीत शिवसेनेने राष्ट्रपती निवडणुकीसाठी जाहीर केलेल्या भूमिकेचे समर्थन केले. ते म्हणाले, नेहेमीच त्यांना जो उमेदवार योग्य वाटतो, त्यांना त्यांनी पाठींबा दिलेला आहे. यापुर्वी प्रणव मुखर्जी यांना शिवसेनेने पाठींबा दिला होता. महाराष्ट्राच्या प्रतिभाताई पाटील काँग्रेसच्या उमेदवार होत्या, त्यांनाही त्यांनी पाठींबा दिला होता.

महाराष्ट्र भूषण तीर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा, निरूपण व सामाजिक क्षेत्रात अलौकिक कार्य करणारे थोर निरुपणकार तीर्थरूप पद्मश्री डॉ. श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी यांची गुरुपौर्णिमेनिमित्त भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी आज रेवदंडा येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन आशिर्वाद घेतले. यावेळी रायगड भूषण डॉ.सचिनदादा धर्माधिकारी, उमेशदादा धर्माधिकारी, तसेच उरण नगरपरिषदेचे माजी नगरसेवक नितीन पाटील उपस्थित होते.

सिडको अभियंताच्या चुकीच्या नियोजनामुळे नागरिकांना होत आहे मनस्ताप

मुर्बी, खारघर, तळोजा व कोपरा येथील वाहनचालक त्रस्त

दै.रायगड नगरी । पनवेल

कोपरा येथील सब वे पुढील दोन पुलावर सातत्याने वाहतुक कोंडी होत असल्याने तेथे होणारी वाहतुक कोंडीचा गंभीर प्रश्न मार्गी लागावा या करीता सिडकोच्या खारघर फेस दोन चे अभियंता यांनी चक्क शॉट कट मारत तळोजा मुर्बी कडुन पनवेल तसेच कोपरा येथे येण्यासाठी जो दुसर्या पुलाचा मार्ग वाहन चालकांकरीता होता तो सिंमेन्ट कठडे बांधुन बंद केल्याने या परीसरात येणारे वाहनचालक संताप व्यक्त करीत आहेत.

नियोजन शुन्य या सीडको अभियंत्याच्या बेबंदशीही मुळे वाहनचालकांचा तसेच शाळकरी वाहन चालकांचा कोणताही सारासार विचार न करता दडपशाहीच्या जोरावर हा मार्ग बंद केल्याने तळोजा, मुर्बी,तसेच खारघर जवळील सेक्टर १३,१४,२० येथील वाहनचालकांना कोपरा अथवा कोकण भुवन अथवा खारघर या ठीकाणी येताना चक्क रोडपाली पुलाला क्रॉस करून वळसा घालुनच यावे लागत असल्याने तसेच टोल नाक्यावर असलेली वाहतुक कोंडीतुन मार्ग काढुन कोपरा ...//२

याबाबत सिडकोच्या खारघर येथील फेस टु च्या अभियंत्याशी भ्रमणध्वनी वरून माहीती घेतली त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.

भर पावसात सिडको अतिक्रमण विभागाकडून बेकायदेशीर मासे विक्रेत्यांवर कारवाई

दै.रायगड नगरी । पनवेल

नविन पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण वाढले असल्याने आज सिडको अतिक्रमण विभागाकडून भर पावसामध्ये नविन पनवेल सेक्टर १४ मधील बेकायदेशीर मासे विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली.

नवीन पनवेल ई वन परिसरात आमराईच्या मागील बाजूस येथिल रहिवाश्यांनी मोकळ्या भूंखडावर बेकायदेशीर चारचाकी वाहने उभी करण्यासाठी शेड उभ्या केल्या होत्या त्यांच्यावर सुध्दा सिडको अतिक्रमण विभागाकडून कारवाई करण्यात आली. सदर धडक कारवाई मुळे बेकायदेशीर रित्या व्यवसाय व अतिक्रमण करणाऱ्याचे धाबे दणाणले आहेत.

संक्षिप्त...

चोळई गावाच्या वळणावर कलंडून ट्रकचे झाले तुकडे

दै.रायगड नगरी । पोलादपूर

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर मध्यरात्रीनंतर ट्रकचा भीषण अपघात होऊन कलंडलेल्या ट्रकचे तुकडे झाले. चोळई गावावर पुर्वीपासून अपघातातील वाहने कोसळण्याची टांगती तलवार असताना अलिकडेच दरडी कोसळण्याची टांगती तलवार चोळई गावावर निर्माण झाली आहे.

पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटामध्ये मुंबई गोवा महामार्गावर चोळई गावच्या हद्दीत ट्रकचा अपघात झाल्याची घटना रात्री २ वाजण्याच्या सुमारास घडली. पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार चालक सुनील सोपान वाघमारे हा आपल्या ताब्यातील ट्रक (क्रमांक एम एच ४३जे ९८५५) हा गोव्याकडून कल्याणकडे घेऊन जात असताना चोळई येथे एका अवजड वळणावर चालकांचे नियंत्रण सुटल्याने ट्रक रस्त्याच्या विरुद्ध दिशेस जाऊन २ वेळा कलंडल्याने हा अपघात घडला. या अपघातात ट्रकचे तुकडे तुकडे झाले. मात्र, चालक सुनील वाघमारे यात सुदैवाने बचावला. या घटनेची खबर पोलादपूर पोलीस ठाण्यात कळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत जाधव व महिला पोलीस नाईक पवार यांनी तातडीने घटनास्थळी जाऊन जखमी चालक सुनील वाघमारे याला पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.

प्रत्येक विद्यार्थ्याने उत्तुंग उद्दिष्ट ठेवले पाहिजे : लोकनेते रामशेठ ठाकूर

दै.रायगड नगरी । पनवेल

शिक्षण कधीही वाया जात नाही आणि मानवी जीवनात शिक्षणाचे महत्व अधिक आहे, त्यामुळे आयुष्यात शिकण्यासारखे प्रचंड आहे, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे वित्त आणि लेखाधिकारी सी.ए. डॉ.प्रदीप कामथेकर यांनी खांदा कॉलनी येथे आज (दि. १३) केले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगु काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (स्वायत्त) येथे प्रथम, द्वितिय, तृतीय वर्ष पदवी व पदव्युत्तर वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे स्फुर्तिस्थान स्व.चांगु काना ठाकूर यांच्या पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून संपन्न झाला. त्यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल महानगरपालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल उपस्थित होत्या. या प्रसंगी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख,पनवेल महानगरपालिकेच्या माजी उपमहापौर सीता पाटील, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत, पनवेल महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे, संस्थेचे सचिव मा. डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य डॉ. एस. के. पाटील आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली .

स्वर्गीय चांगु काना ठाकूर यांचे पुण्य स्मरण आणि त्यांच्या आदर्श विचारांचा वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी आयोजिलेल्या कौतुक सोहळ्यामध्ये पारितोषिक प्राप्त विध्यार्थ्यांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

डॉ.प्रदीप कामथेकर यांनी, माणसाने आयुष्यात नेहमी सक्रिय विद्यार्थी बनून सातत्याने अभ्यास करत ज्ञानसंपादन केले पाहिजे. असे सांगतानाच १०० टक्के प्रयत्न म्हणजेच यशाची खात्री असते, असे अधोरेखित केले. तसेच ...//२

पनवेल येथील जिल्हा न्यायालय येथे गुरू पौर्णिमा साजरी करण्यात आली. सदर ठिकाणी सिनियर वकील ॲड.मदन गणपत गोवारी, ॲड.सचिन म्हात्रे, ॲड.शैलेश नाईक, ॲड. धनराज तोकडे, ॲड.शशिकांत मुंढे, ॲड.विजय मुंढे, ॲड धाडस भोपी, ॲड.मिल्का घरत, ॲड.प्रियांका ठाकूर, ॲड.निशा ठाकूर, ॲड.समीर शेख, ॲड.ऋषिरज पवार उपस्थित होते.

उरण तालुक्यात रस्त्यांची बिकट अवस्था

दै.रायगड नगरी । उरण

आंधळं दळतंय कुत्र पीठ खातंय अशी अवस्था उरण मध्ये झाली आहे. शासकीय अधिकाऱ्यांना जनतेच्या समस्यांशी काही देणे घेणे आहे की नाही असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडला आहे.उरण तालुक्यातील सर्व रस्त्यांची अक्षरशः दुर्दशा झाली आहे.तालुक्यातील सर्वच रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य असल्याने एका पावसात चाळण झालेल्या या रस्त्यांवर खर्च केलेला करोडोंचा निधी खड्डयात गेल्याची संतप्त भावना जनतेतून व्यक्त होत आहे.

भौगोलिक दृष्ट्या उरण तालुक्याचा विचार करता उरण तालुका हा सखल विभाग असलेला तालुका आहे.पूर्व विभागात डोंगर पट्टा व पश्चिम विभागात खाडीपट्टा अशी भौगोलिक ...//२

मोरझोत धबधब्याचा रस्ता खचतोय

दै.रायगड नगरी । पोलादपूर

तालुक्यातील वर्षा पर्यटनासाठी लोकप्रिय ठरलेला मोरझोतचा धबधबा आणि थंड हवेचे कुडपण या दोन्ही ठिकाणी वर्षा पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी जाणे धोकादायक परिस्थितीत स्वतःहून शिरण्यासारखे ठरणार आहे. मोरझोत धबधब्याचा रस्ता खचत असल्याची माहिती खोपड चांदके उमरठ येथील ग्राम स्थ देत असून कुडपण खुर्दच्या रस्त्यावर मातीचे ढिगारे कोसळत असल्याने पर्यटन असुरक्षित झाले आहे.

पोलादपूर तालुक्यातील मोरझोत या उमरठ ते चांदके या दरम्यानच्या जिल्हा परिषदेच्या रस्त्यालगत असलेल्या धबधब्याकडे मुसळधार पावसात मोठ्या गर्जनेसह कोसळणाऱ्या जलधारांचा आनंद घेण्यासाठी तरूणाईची विशेष गर्दी होत असते. मात्र, गेल्यावर्षी या धबधब्यामध्ये आजुबाजूच्या डोंगरातून लालमातीचे ढिगारेदेखील कोसळल्याने या धबधबा आकाराने खुपच रूंदावला. यावर्षीदेखील धबधब्याकडे जाणाऱ्या ...//२

भाड्याने देणे आहे

जिल्हा सत्र न्यायालय समोरील, लोखंडीपाडा, पनवेल येथील हॉटेल भाड्याने देणे आहे.

संपर्क : ९८६७७०४४१६/ ९५९४०९३१११

पेणच्या बंटी-बबलीचा तुरुंगातील मुक्काम आणखी ४ दिवस वाढला

पेण पोलिसांकडून दोन्ही आरोपींची संपूर्ण मालमत्ता व सर्व बँक अकाउंट गोठवण्याची शक्यता?

दै.रायगड नगरी । पेण

जिल्ह्यातील असंख्य तरुण-तरुणींना फसविणाऱ्या पेणच्या बंटी-बबली या जोडीचा पेण पोलीस स्टेशनच्या तुरुंगातील मुक्काम आणखी ४ दिवस वाढला आहे. जेएसडब्ल्यू कंपनीत नोकरी देण्याचे तसेच याच कंपनीत भंगार ठेका मिळवून देण्याचा खोटा बनाव करुन आत्तापर्यंत जिल्ह्यातील ४३ तरुणांची लाखो रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी अल्पावधीतच बंटी-बबली म्हणून कुप्रसिद्ध झालेल्या प्रवीणा सावंत व अतुल मांडवकर या गोळजोडीची संपूर्ण मालमत्ता व सर्व बँकेतील अकाउंट गोठविणे, या कटातील आणखी आरोपींचा शोध घेणे व या केस संदर्भात अधिक तपास करण्यासाठी पेण न्यायालयाने १६ जुलै पर्यंत पोलीस कस्टडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

लाईन आळी,पनवेल येथील फिर्यादी अजय पाटील यांनी पेण पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादी नुसार, डोलवी येथील जेएसडब्ल्यू कंपनीत भंगारचा ठेका व विविध विभागात वेगवेगळ्या नोकऱ्या मिळवून देतो असा खोटा बनाव करून एका राजकीय पक्षाची स्वयंघोषित नेत्या प्रविणा सावंत (रा.गुरुकृपा सोसायटी,पेण) तसेच तिचा पेण येथील साथीदार अतुल मांडवकर या आरोपी गोळजोडीने जिल्ह्यातील ४३ तरुणांकडून प्रत्येकी ३० हजार ते १ लाख २० हजार रुपये पर्यंत घेऊन ३१ लाख ७९ हजार रुपयांची फसवणूक केली आहे.

सदर फसवणुकीच्या गुन्ह्याचा सखोल तपास करताना पेण पोलिसांना नवनवीन धक्कादायक माहिती मिळत आहे. त्यामुळे सदर आरोपींसोबत आणखी महिला-पुरुष साथीदार असल्याचा संशय ही पोलिसांना येत आहे. त्यामुळे या बंटी-बबली जोडीची संपूर्ण मालमत्ता जप्त करणे, त्याचबरोबर सर्व बँकेतील अकाउंट गोठविणे, या फसवणुकीच्या कटातील आणखी आरोपींचा शोध घेणे व या गुन्ह्याच्या खोलवर जाऊन अधिक तपास करण्यासाठी सदर आरोपींना आज पुन्हा न्यायालयात हजर केले असता या आरोपी जोडगोळीला १६ जुलै पर्यंतची पोलीस कस्टडी सुनावण्यात आली आहे.

या प्रकरणी पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या आदेशानुसार व पेण पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पी.टी.काळे व पोलीस कर्मचारी हे अधिक तपास करीत आहेत.

या फसवणूक प्रकरणातील दोन्ही आरोपींची संपूर्ण मालमत्ता व सर्व बँक अकाउंट न्यायालयाच्या आदेशानुसार पेण पोलिसांकडून गोठविण्यात येणार असल्याने फिर्यादीचे कुटुंब व पेण तालुक्यातील नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे.

भालगुल पुलाची एक बाजू खचली

दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

अतिवृष्टीमुळे पाली खोपोली राज्य महामार्गावर बुधवारी (ता.१३) भालगुल गावाजवळील पुलाची एक बाजू खचली आहे. त्यामुळे येथे दुर्घटनेची शक्यता निर्माण झाली आहे.

खोपोली बाजूकडून पाली कडे येतांना भालगुल पुलाच्या सुरुवातीलाच उजव्या बाजूची माती व डांबरी भाग थोडा ढासळून खचला आहे. त्यामुळे पुलाला आधार देणाऱ्या खांबाची (पिलर) ही बाजू कमकुवत होऊन पूल व रस्ता यामध्ये खड्डा पडून अपघाताचा धोका संभवतो. या घटनेची माहिती मिळताच सुधागड पाली तह-सीलदार दिलीप रायण्णावार व एमएसआरडीसी उपअभियंता सचिन निफाडे यांनी पुलाची पाहणी केली. तसेच खचलेल्या बाजूकडील मार्गावर व लोखंडी खांब व रिफ्लेक्टर पट्ट्या लावून पुलावरील या बाजूची वाहतूक बंद करून वाहतूक पुलाच्या एका बाजूने सुरू ठेवण्यात आली.

प्रशासनाची आण-बाण-शान ; तत्परतेने वाचविले सहा जणांचे प्राण

दै.रायगड नगरी । अलिबाग

गेल्या दोन महिन्यांपासून जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापनाची जय्यत तयारी केली आहे; अगदी मनुष्यबळापासून तर आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्यासह.

आज दुपारी ३ ते ३.३० च्या सुमारास एकूण ६ युवक उंदीर व खेकडे पकडण्यासाठी अंबा नदीच्या पलीकडे गेले होते. मात्र भरतीमुळे पाण्याची पातळी अचानक वाढली आणि हे युवक पाण्याने वेढले गेले. याबाबतची माहिती मिळताच रोहा प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार, तहसिलदार कविता जाधव, पोलीस निरीक्षक श्री.नारनवर, त्यांचे कार्यालयीन सहकारी आणि महेश सानप यांच्या रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी या सहा युवकांची सहीसलामत सुटका करण्यासाठी तात्काळ उपाययोजना अंमलात आणल्या.

१.रवींद्र मनोरम नाईक २.अंकुश अनंत नाईक ३.सचिन सुरेश नाईक ४.गणेश गोविंद नाईक सर्व रा.माची सागरगड पोस्ट-खंडाळे ता - अलिबाग ५.समीर सत्यवान नाईक रा - मेडेखार ता - अलिबाग ६.रवींद्र धाकू वाघमारे रा -पळस ता - रोहा अशी या वाचविलेल्या युवकांची नावे आहेत.

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांचे नियोजन, त्यांनी प्रशासनातील विविध स्तरातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना, आपत्ती व्यवस्थापनाचे कार्य करणाऱ्या स्वयंसेवकाना ओरिसा येथील चक्रीवादळ आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण केंद्रात पाठविण्याचा निर्णय, आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक साहित्याची उपलब्धता आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्यांचे अधिकारी-कर्मचाऱ्यांना मिळणारे पाठबळ, या सर्वांच्या बळावर जिल्हा प्रशासनाने नैसर्गिक आपत्तीत जीवितहानी किंवा वित्तहानी कमीत कमी होईल याची दक्षता घेण्याचा निर्धारच केलेला आहे. आणि प्रशासनाने ठरविलेल्या आण-बाण-शान ने आज या सहा युवकांचे प्राण वाचविण्यात जिल्हा प्रशासनाला यश मिळाले आहे. यासाठी स्थानिक ग्रामस्थांचेही मोलाचे सहकार्य लाभले आहे. जीव वाचलेल्या सर्व युवकांनी तसेच ग्रामस्थानीही जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर आणि प्रशासनाचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

माथेरान नगरपरिषदेकडुन रेस्क्यू टीमला साहीत्य वाटप

दै.रायगड नगरी । माथेरान

माथेरान गिरीस्थान नगरपरिषदने आ-पत्ती व्यवस्थापन अंतर्गत नैसर्गिक आपत्तीत मदत व्हावी यासाठी टेंडर प्रक्रिया करून, आपत्ती मध्ये लागणारे अत्यावशक साहित्य रेस्क्यू टीम च्या आवश्यकते नुसार, आणि गरजेप्रमाणे ऑर्डर तयार करून, त्याची मागणी केली होती.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत नगरपरिषद माथेरानला, त्यासाठी पाच लक्ष इतका निधी प्राप्त झाला असून, त्यातून च आपत्ती निवारणासाठी ह साहित्य आपण खरेदी करू शकलो आहे. असे कार्यतप्तर प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी यावेळी सांगितले.

रेस्क्यू टीम माथेरान, आणि आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत काही प्रतिनिधीना आज दि १३ जुलै रोजी मा स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे सभागृहात सदरील साहित्याचे वितरण, अधीक्षक दीक्षांत देशपांडे , सहायक पो-लीस निरीक्षक शेखर लव्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरेखा भणगे वितरित करण्यात आले आहे.यावेळी रेस्क्यू टीमचे अध्यक्ष वैभव नाईक, सुनील कोळी, उमेश मोरे, अक्षय परब, चेतन कळंबे, सोनाली सुतार, अजिंक्य सुतार, अमित कोळी, महेश काळे, राहुल चव्हाण आदी प्रतिनिधी उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

पेणच्या बंटी-बबलीचा तुरुंगातील मुक्काम आणखी ४ दिवस वाढला

गोठविणे, या फसवणुकीच्या कटातील आणखी आरोपींचा शोध घेणे व या गुन्ह्याच्या खोलवर जाऊन अधिक तपास करण्यासाठी सदर आरोपींना आज पुन्हा न्यायालयात हजर केले असता या आरोपी जोडगोळीला १६ जुलै पर्यंतची पोलीस कस्टडी सुनावण्यात आली आहे.

या प्रकरणी पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या आदेशानुसार व पेण पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पी.टी.काळे व पोलीस कर्मचारी हे अधिक तपास करीत आहेत. या फसवणूक प्रकरणातील दोन्ही आरोपींची संपूर्ण मालमत्ता व सर्व बँक अकाउंट न्यायालयाच्या आदेशानुसार पेण पोलिसांकडून गोठविण्यात येणार असल्याने फिर्यादीचे कुटुंब व पेण तालुक्यातील नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे.

सिडको अभियंताच्या चुकीच्या नियोजनामुळे नागरिकांना होत आहे मनस्ताप

तसेच पुढील ठीकाणी प्रवास करावा लागत आहे आधीच महागाईने सर्व सामान्य नागरीकांचे कंबरडे मोडले आहे पेट्रोल डीझेल बरोबरच सी.एन.जी.चे दर देखील या दोघांची बरोबरी करायला स्पर्धेत असल्याने इंधनाचा खर्च सामान्य नागरीकांच्या हाताबाहेर जात आहे याचा विचार न करता खारघर फेस टु येथिल अभियंता यांनी पोलीस बळावर चक्क एक पुलावर पुढे मोठे सिमेंटच्या ब्लॉकचे कठडे उभारून येथील कोपरा कडुन सब वे कडे जाणारा (शॉट कटच) बंद केल्याने तसेच साध्या दोन चाकी वाहनांचा देखील मार्ग बंद केल्याने वाहन चालकांत नाराजीचा सुर आहे प्रामुख्याने कोपरा गावातील शाळकरी मुलांच्या दोन चाकी व शालेय वाहनांही ये जा करण्यास पुर्ण वळसा घेऊनच कोपरा येथे यावे लागत आहे. वास्तविक या सिडको अभियंत्याने कोपरा सब वे नंतरचा जो डाव्या हाताचा पुल आहे त्या ठिकाणी नाल्याला लागुनच जागा आहे ती जेसीबीच्या सहाय्याने सिडकोच्या माध्यमातुन थोडी सुस्थीतीत केली असती तर सब वे मधुन तसेच मुंबई बाजुकडुन खारघर सेक्टर १३,१४,२० या ठिकाणी जाणारी मोठी व छोटी वाहने देखील अगदी सुरळीत पणे मार्गक्रमण झाली असती जेणेकरून सेक्टर १५,१६,१७,१८ येथील वाहनचालकांना देखील सुलभपणे प्रवास करता आला असता मात्र तसे न करता दुसर्या पुलापूढे जी छोटी भींत टाकुन वाहनचालकांना नाहक अडथळा या फेस टु च्या अभियंत्याने विनाकारण निर्माण केला आहे तो ही करण्याची गरज भासली नसती असे वाहनचालकांतुन बोलले जात आहे.

प्रत्येक विद्यार्थ्याने उत्तुंग उद्दिष्ट ठेवले पाहिजे : लोकनेते रामशेठ ठाकूर

आई वडिलांचे ऋण लक्षात ठेविले पाहिजे, असेही नमूद केले.

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अध्यक्षीय भाषणात पारितोषिक प्राप्त विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रत्येक विद्यार्थ्याने उत्तुंग उद्दिष्ट ठेवले पाहिजे असे नमूद करत त्यांना पुढील वाटचालीकरता शुभेच्छा दिल्या. या सोहळ्यामध्ये सर्व पालक व गुणवंत विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.(डॉ.) एस. के. पाटील यांनी कौतुक केले व महाविद्यालयाच्या कीर्तीचा मागोवा घेतला. तसेच या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी परिषद तथा विद्यार्थी कल्याण कक्षाच्या अध्यक्षा डॉ. एम. ए. म्हात्रे, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. बी. डी. आघाव व महिला विकास कक्षाच्या प्रमुख डॉ. आर.डी.म्हात्रे यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रा. डॉ. आर. व्ही. येवले, प्रा. डॉ. जि. एस. तन्वर, प्रा. ए. व्ही. पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन प्रा.एस.एन. परकाळे यांनी केले.

उरण तालुक्यात रस्त्यांची बिकट अवस्था

परिस्थिती असणाऱ्या या तालुक्यात रस्त्यांचे मोठे जाळे पसरले आहे.प्रवाशी वाहतुकीच्या रस्त्यांबरोबरच जेएनपीटी बंदराच्या अवजड वाहतुकीचा भार या रस्त्यांवर पडला जातो. त्यामुळे उरण तालुक्यातील रस्त्यांवर दरवर्षी सिडको,सार्वजनिक बांधकाम विभाग,जिल्हापरिषद,जेएनपीटी, यांच्या मार्फत करोडोंचा निधी खर्च केला जातो.मात्र ठेकेदार व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बेजबाबदार वृत्तीमुळे करोडोंचा खर्च होऊनही तालुक्यातील रस्ते दरवर्षी खराब होतात. हे सत्र यावर्षीही कायम असून दिघोडे दास्तान फाटा,कोप्रोली-खोपटा -उरण,उरण-पनवेल या,जेएनपीटी कडे जाणारे रस्ते ,बीएमसीटी बंदराकडे जाणाऱ्या पुलावरील खड्डे तसेच या रस्त्यांबरोबरच सिडकोच्या द्रोणागिरी विभागातील रस्त्यावर खड्डे झाले आहेत.रस्त्यांवर मोठमोठे खड्डे निर्माण होऊन त्यामध्ये चिखल मातीचे पाणी साठले आहे.त्यामुळे वाहन कसे चालवावे या प्रश्नाने वाहन चालक त्रस्त आहेत.या मोठमोठ्या खड्यांमुळे दुचाकी वाहनांचे सतत अपघात घडत असून गेल्या काही वर्षात उरणच्या या रस्त्यांवर सुमारे हजार च्या वर तरुणांचा बळी गेला आहे.त्यामधील अनेक अपघात हे रस्त्यावरील खड्ड्यांमुळे झाले आहेत.

उरण तालुक्यात जेएनपीटी च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात मालाची साठवणूक करण्यासाठी अनेक गोदामे निर्माण झाली आहेत.या गोदामात माल आणणाऱ्या अवजड कंटेनर ट्रेलर्स मुळे रस्त्यांवर मोठमोठे खड्डये निर्माण झाले आहेत.या अनिर्बंध अवजड वाहतुकीवर कोणाचेही नियंत्रण नसल्याने उरणच्या रस्त्यांची दैन्यावस्था झाली आहे.पर्यायाने हे खड्डये अपघातांना आमंत्रण ठरत आहेत.या खड्ड्यामुळे व खराब रस्त्यामुळे आजपर्यंत १००० हुन जास्त छोटे मोठे अपघात झालेले आहेत. तरीही प्रशासनाला जाग येताना दिसून येत नाही. दरवर्षी रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी करोडोंचा निधी सिडको,सार्वजनिक बांधकाम विभाग जेएनपीटी ,नॅशनल अथोरिटी खर्च करीत असतात.त्यातच या विभागातील अधिकाऱ्यांच्या मर्जीतीलच ठेकेदाराला कंत्राट देऊन फुटलेल्या रस्त्यांचा तकलादू विकास केला जातो.या करोडोंचा विकास निधीमुळे ठेकेदार व अधिकारी मात्र मालामाल होत असल्याचे विदारक चित्र उरण तालुक्यात दिसून येत आहे.निकृष्ट दर्जाचे रस्ते बनविणाऱ्या व निकृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर, ठेकेदारांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जनतेतून दरवर्षी केली जाते पण शासकीय अधिकारी व ठेकेदारावर कोणतेही कायदेशीर कारवाई होताना दिसून येत नाही.

मोरझोत धबधब्याचा रस्ता खचतोय

वर्षापर्यटकांना धबधब्याच्या जलधारांसोबत मातीचे दगडाचे ढिगारे कोसळण्याची भिती वाटत असून अनेकांनी गेल्या काही दिवसांमध्ये रस्त्यावर येऊन कोसळणाऱ्या मोरझोतच्या पाण्याचा मारा अनुभवल्याने ते कोणालाही या धबधब्याकडे जाण्याचा सल्ला देत नसल्याचे दिसून आले आहे. दरम्यान, या धबधब्याकडे जाणारा रस्ता खचत असल्याचे तसेच काही ठिकाणी रस्त्याला तडे पडल्याने या मार्गाने प्रवास करणे धोकादायक असल्याचे फलक लावण्यात आले आहेत.

मंगळवारी कुडपण खुर्द येथून कुडपण बुद्रुकपर्यंत जाणाऱ्या रस्त्यालगतच्या डोंगरातून मोठ्या प्रमाणात लालमाती डांबरी रस्त्यावर कोसळल्याने ही दरड हटविण्यासाठी काही तास जेसीबीने काम करावे लागले. या रस्त्यालगतचा डोंबर उभा कापण्यात आल्याने डोंगरातून दरडी रस्त्यावर कोसळत असल्याचे दिसून आले आहे. सध्या कुडपण खुर्द येथील रस्त्यावरील दरडी हटविण्यात आलेल्या ठिकाणी चिखलमय रस्ता झाला असून दुचाकी आणि चारचाकी वाहने आणि पादचाऱ्यांना हळू वाटचाल करावी लागत आहे. त्यामुळे या परिसरात येणाऱ्या पर्यटकांची संख्याही रोडावली आहे.

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना
(हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे-उलवे, ता. पनवेल, जि.रायगड येथील खालील नमूद केलेली जमीन मुळ भुधारक **१) श्री. रामभाऊ बालाजी भगत व इतर** यांचे कडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे.

भूसंपादन कायद्यानुसार सदर जमिनीची देय होणारी नुकसान भरपाई वरील भूधारकांनी स्वीकारली असून संपादित जमिनीचा ताबा देखील त्यांनीच दिला आहे.

१.भूखंडांचा तपशील पुढीलप्रमाणे:

संचिका क्र. /नोड	निवाडा क्र.	संपादित सर्व्हे क्र. / हिस्सा क्र.	संपादित क्षेत्र (हे. आर)	इरादित भूखंडाचा तपशील			
				नोड	भूखंड क्र.	सेक्टर क्र.	क्षेत्र (चौ. मी.)
संचिका क्र. २००/उलवे	२०४	२७/२ ४०/५ ४१/१	०-६२-० ०-२३-९ ०-१२-७	उलवे	२९	१९	७५० चौ.मी. प्रस्तावित

शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार साडेबारा टक्के योजनेअंर्तगत भूधारकांना उलवे नोड येथील भुखंड क्र.२९, सेक्टर-१९, क्षेत्र-७५० चौ.मी. भूखंडाचे इरादापत्र देण्यात आले आहे.

सदर भूखंड वाटपास पात्र असलेल्या भूधारक **१) श्रीमती अनुबाई ऊर्फ अनुसया काना केणी २) श्री. महेश प्रमोद पाटील ३) श्री. विश्वास प्रमोद पाटील ४) श्रीमती राजश्री प्रमोद पाटील ऊर्फ प्रसिध्दी प्रविण कासकर ५) श्रीमती भाग्यश्री प्रमोद पाटील ऊर्फ भाग्यश्री दत्तात्रेय पाटील ६) श्रीमती मिनाबाई सिताराम भगत ७) श्रीमती सुजाता सिताराम भगत ऊर्फ सुजाता धनाजी भगत ८) श्रीमती गंगाबाई अनंत ऊर्फ अनंता भगत ९) श्रीमती वैशाली दत्तात्रेय गोवारी १०) श्रीमती इंद्रा निलेश गोवारी ११) श्रीमती रोशनी उमेश सुरते** यांनी सह दुय्यम निबंधक, पनवेल यांच्याकडे हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून प्रस्तावित भूखंडाचे लाभ **१) श्री. भगवान रामभाऊ भगत २) श्री. विनोद सिताराम भगत ३) श्री. दिनेश सिताराम भगत ४) श्री. श्रीधर सिताराम भगत ५) श्री. सागर अनंत ऊर्फ अनंता भगत** यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहे. सदर हक्कसोडचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग दोन, गुरूवार, मे २९, २०१४/ज्येष्ठ ८, शके १९३६, असाधारण क्रमांक २९, प्राधिकृत प्रकाशन, महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्ट - १९६६, नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) विनियम, २००८ मधील विनियम १० नंतर समाविष्ट करावयाच्या **'१०अ'** मधील मूद्दा क्र. **ii** अन्वये संबंधीत हक्कसोडपत्रामध्ये भूखंड क्र., सेक्टर क्र., व क्षेत्राचा उल्लेख असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे हक्कसोडपत्रामध्ये इरादित **भूखंड क्र. २९, सेक्टर-१९, क्षेत्र-७५० चौ.मी.** भूखंडाचा तपशील नमूद केला आहे. तसेच मौजे तरघर, निवाडा क्र. २०४, सं.नं/हि.नं- २७/२, ४०/५, ४१/१, एकूण क्षेत्र-०-९८-६ हे.आर. या संपादित जमिनीचा उल्लेख केला आहे.

हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे	हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे
१) श्रीमती अनुबाई ऊर्फ अनुसया काना केणी	१) श्री. भगवान रामभाऊ भगत
२) श्री. महेश प्रमोद पाटील	२) श्री. विनोद सिताराम भगत
३) श्री. विश्वास प्रमोद पाटील	३) श्री. दिनेश सिताराम भगत
४) श्रीमती राजश्री प्रमोद पाटील ऊर्फ प्रसिध्दी प्रविण कासकर	४) श्री. श्रीधर सिताराम भगत,
५) श्रीमती भाग्यश्री प्रमोद पाटील ऊर्फ भाग्यश्री दत्तात्रेय पाटील	५) श्री. सागर अनंत ऊर्फ अनंता भगत
६) श्रीमती मिनाबाई सिताराम भगत	
७) श्रीमती सुजाता सिताराम भगत ऊर्फ सुजाता धनाजी भगत	
८) श्रीमती गंगाबाई अनंत ऊर्फ अनंता भगत	
९) श्रीमती वैशाली दत्तात्रेय गोवारी	
१०) श्रीमती इंद्रा निलेश गोवारी	
११) श्रीमती रोशनी उमेश सुरते	

उपरोक्त नोंदणीकृत हक्कसोड्नुसार सिडकोकडून केवळ खालील नमूद केलेल्या व्यक्तिच भूखंडाचे वाटप स्वीकारून करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरु शकतात.

हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे
१) श्री. भगवान रामभाऊ भगत
२) श्री. विनोद सिताराम भगत
३) श्री. दिनेश सिताराम भगत
४) श्री. श्रीधर सिताराम भगत,
५) श्री. सागर अनंत ऊर्फ अनंता भगत

वरील इरादित केलेल्या भूखंडा संदर्भात नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार सोडले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार यापुढे साडेबारा टक्के योजनेसंदर्भातील लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३०(तीस) दिवसांच्या आत सर्व पुरावे योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही, असे समजुन वरील इरादित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. सदर जाहीर सूचना ही संबंधित गावाचे ग्रामपंचायत, तहसील कार्यालय तसेच सिडको व सिडकोला योग्य वाटेल, अशा ठिकाणी सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

मुख्य भूमी व भूमापन अधिकारी

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/१५८/२०२२-२३

पनवेल महानगरपालिका
जाहीर नोटीस

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी व्यक्ती, संस्था, ठेकेदार, किंवा कंपनी यांचेकडून ई-निविदा पद्धतीने निविदा मागवित आहेत. खालील कामाचे कोरी निविदा फॉर्म https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि.१४/०७/२०२२ ते दि.०८/०८/२०२२ पर्यंत सायंकाळी १५.०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदरच्या जाहीर ई-निविदा ऑनलाईन कार्यप्रणालीद्वारे स्वीकारण्यात येतील.

अ.क्र.	कामाबाबत तपशिल	कामाची मुदत	बयाणा रक्कम	कोरी ई-निविदा फॉर्मची किंमत
१	पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील निरनिराळ्या जागेवरील व रस्त्यांवरील डेब्रीज उचलणे व सपाटीकरण करणेबाबत.	०३ वर्ष	रु.र६३,०००/-	रु.१,०००/- +१८% GST

जा.क्र.पमपा/घकवि/२५२२/प्र.क्र.३८३/४६१/२०२२
दि.१३/०७/२०२२

सही/-
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

आजादी महोत्सवा निमित्त पनवेल रेल्वे स्टेशन ते लोणावळा मोटार सायकल रॅली

दै.रायगड नगरी । पनवेल

देशाच्या आजादी महोत्सवा निमित्त पनवेल रेल्वे स्टेशन ते लोणावळा मोटार सायकल रॅली आरपीएफ जवानांनी काढली होती .

या रॅलीला डी एस सी -०१ कल्याणचे नवीन कुमार, स्टेशन मास्टर जगदीश प्रसाद मीणा, पोलीस अधिकारी जसबीर राणा यांच्यासह टी सी चे पथक उपस्थित होते त्यांनी झेंडा उंचावून या रॅलीला शुभेच्या दिल्या.

हनुमान नगर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार व शालेय विद्यार्थांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप

दै.रायगड नगरी । खांब-रोहा

रोहे शहरातील हनुमान नगर येथील सन -२०२२ या शैक्षणिक वर्षामध्ये उत्तमप्रकारे गुण संपादित करून उत्तीर्ण झालेल्या १०वी,१२वी व पदवीधर गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार आणि शालेय विद्यार्थांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप करून गितराज म्हस्के यांनी सामाजिक बांधिलकी जपण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण उपक्रम राबवित असतात..

सालाबादप्रमाणे यावर्षी देखील गितराज म्हस्के यांच्या माध्यमातून सन -२०२१ / २२ या शैक्षणिक वर्षामध्ये उत्तमप्रकारे गुण संपादित करून उत्तीर्ण झालेल्या १०वी,१२वी व पदवीधर गुणवंत यशस्वी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार केले तर शालेय विद्यार्थांना वह्या,रजिस्टर,पेन, पेन्सिल,कम्पोस बॉक्स शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात करीत जपली सामाजिक बांधिलकी जपण्याच्या दृष्टीने दरवर्षी महत्त्वपूर्ण उपक्रम राबवित असतात त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम प्रसंगी उपक्रमशिल शिक्षक तथा मार्गदर्शक नंदकुमार मरवडे सर यांनी विद्यार्थांनी शालेय जीवनामध्ये विद्यार्थांनी अभ्यासाकडे दुर्लक्ष न करता मोठ्या चिकाटीने,जिद्दीने व सातत्यपूर्ण प्रयत्न करत अभ्यासाकडे लक्ष वेधून उच्चतम ध्येय डोळ्यासमोर ठेऊन आपली शैक्षणिक प्रगती साधावी असे मौलिक मार्गदर्शन केले. याप्रसंगी हनुमान नगर येथील जेष्ठ नागरिक कृष्णा म्हस्के, नरे बाबा,प्रमोद मयेकर,परशुराम शिर्के, कृष्णा शिंदे,रमेश थळे,गोटिराम मालुसरे, नंदू वागळे, योगिराज म्हस्के, अमित कासट,विष्णू नरे,निखिल शिर्के, जनार्दन ठाकूर,मयूर मालुसरे,आकाश उमटराकर,राजेंद्र गावडे,राजू जाधव,कला पवार, प्रज्योती मयेकर,महिला संरक्षण संघटनेच्या रोहा शहराध्यक्षा निविता जंगम,आदी विविध क्षेत्रा-तील प्रतिष्ठित मान्यवर मंडळी व मोठ्या संख्येने तरूण मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

नागोठण्याजवळील चिकणी येथे पुराच्या पाण्यात अडकलेल्या गुराख्याची सुटका

दै.रायगड नगरी । नागोठणे

नागोठण्याजवळील चिकणी गावाच्या परिसरातील अंबा नदी किनारील भागात बक-या चारण्यासाठी गेलेल्या व पुराच्या पाण्यात अडकलेला ५५ वर्षीय नेपाळी गुराखी संदीप निवर याच्यासह १९ बक-या व कुत्र्याला सुखरूपपणे पुराच्या पाण्यातून बाहेर काढण्यास यश आले. कोलाड येथील महेश सानप यांच्या प्रसिद्ध अशा वाईंडर वेस्ट ॲडव्हेंचर रेस्क्यू टीमचे पप्पू पवार, रोशन सानप, हरेश सानप व विकास नेगी या चौघांच्या बचाव पथकाने ही कौतुकास्पद कामगिरी केली.

चिकणी येथील रेल्वे पूल नजीकच्या परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या मोहन राठोड यांच्याकडे कामाला असलेला गुराखी संदीप हा नेहमीप्रमाणे मंगळवारी (दि.१२) सकाळी ११ वाजता हॉटेल गुलमोहरच्या नवीन इमारतीचे काम सुरु असलेल्या मागील बाजूकडे व अंबा नदिकिनारील भागात १९ बक-या व एक कुत्र्यासह गेला होता. काहीशा उंच सखल भागात बक-या चारत असतांना दुपारच्या वेळी अंबा नदीचे पाणी आजूबाजूच्या शेतात सभोवती वाढल्याने त्याला बाहेर पडणे शक्य झाले नाही. त्यावेळी त्याने तेथील एका बंद अवस्थेतील घराचा आसरा घेऊन बक-यांसह तो तिथेच थांबला. गुराखी येत नाही म्हणून राठोड यांनी त्याचा शोध घेतला असता गुराखी पुराच्या पाण्यात अडकल्याची राठोड यांना कल्पना आली. त्यांनी त्वरित याची माहिती नागोठणे पोलिसांना दिल्याने पोलिसांनी क्षणाचाही वेळ न दवडता बचाव पथकाला पा-चारण केले. त्यानंतर बचाव पथकाने आपली कामगिरी चोखपणे पार पाडत सायंकाळी सुमारे ६.४५ वा. च्या सुमारास गुराखी व बक-यांची सुटका केली. या मोहिमेत नागोठण्याचे पोलिस निरिक्षक तानाजी नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ह. विनोद पाटील, पो.ह. गणेश भोईर, पो. ना. नितेश पाटील, पो. शि. सत्यवान पिंगळे आदींचे मोलाचे सहकार्य मिळाले. या घटनेची माहिती मिळताच नागोठणे कोळीवाड्यातील पूर परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आलेल्या रोहा तहसीलदार कविता जाधव यांनीही घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी नागोठणे पोलिस निरिक्षक तानाजी नारनवर, मंडळ अधिकारी सुनील जाधव आदी उपस्थित होते. त्यानंतर तहसीलदार कविता जाधव यांनी नागोठणे ग्रामपंचायतीच्या कार्यालयात भेट देऊन सरपंच डॉ. मिलिंद धात्रक यांच्याकडून नागोठण्यातील पूर परिस्थितीचा आढावा घेतला. दरम्यान कोलाडच्या वाईंडर वेस्ट ॲडव्हेंचरच्या बचाव पथकाने एका व्यक्तीसह मुक्या प्राण्यांचेही प्राण वाचविल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

रानसई धरण ओव्हर फोर भरुन वाहू लागले

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यातील जनतेला व प्रकल्पांना पाणी पुरवठा करण्यात येणारा रानसई धरण बुधवारी (दि१३) ओव्हर फोर भरुन वाहू लागले असल्याची माहिती एम आय.डी सी उरण कार्यालयाचे उप अभियंता रविंद्र चौधरी यांनी दिली आहे.

उरण तालुक्यातील अनेक प्रकल्पांना तालुक्यातील जनतेला उरण तालुक्यातील रानसई धरणातून पाणीपुरवठा हा एम आय डी सी च्या माध्यमातून करण्यात येत आहे.मागील चार पाच दिवस उरण तालुक्यात मुसळधार पाऊस पडत असल्याने नद्या व नाल्यांना पूर आला आहे.त्यातच बुधवारी (दि१३) गुरु पौर्णिमेच्या दिवशी दुपारी २ च्या सुमारास तालुक्यातील जनतेला व प्रकल्पांना पाणी पुरवठा करण्यात येणारा रानसई धरण ओसंडून वाहू लागल्याची माहिती एम आय डी सी उरणचे उप अभियंता रविंद्र चौधरी यांनी दिली आहे.त्यामुळे येणाऱ्या वर्षात उरणच्या जनतेला मूबलक पाणी पुरवठा होणार असल्याने जनतेने समाधान व्यक्त केला आहे.

चिरनेर परिसरात अचानक कोंबड्यांचा मृत्यू दर वाढला; शेतकरी हवालदिल

दै.रायगड नगरी । उरण

पावसाचा जोर वाढल्याने चिरनेर परिसरात अचानक कोंबड्यांचा मृत्यू दर वाढला आहे. घरगुती पालीव गावठी कोंबड्या आणि कुक्कुटपालनातील कोंबड्या या काही कळण्याच्या आतच जलद गतीने मरण पावत आहेत. त्यातच पशुवैद्यकीय दवाखान्यात औषधे उपलब्ध नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

चिरनेर परिसरातील शेतकरी, आदिवासी बांधव हे आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लागावा यासाठी घरगुती गावठी कोंबड्याचे पालन करत आहेत. तसेच काही शेतकरी हे कुक्कुटपालनाच्या माध्यमातून भात शेतीला जोडधंदा म्हणून आर्थिक उत्पन्न मिळण्यासाठी प्रयत्न करत आहेत. परंतु जुलै महिन्यात पावसाचे प्रमाण वाढल्याने चिरनेर परिसरात अचानक कोंबड्यांचा मृत्यू दर वाढला आहे. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे.

गणेश कडू यांचे मानण्यात आले मराठ्यांचे महाकुटुंब यांच्याकडून आभार

दै.रायगड नगरी । पनवेल

मराठा भवन पनवेल मध्ये व्हावे असा विषय पनवेल महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या महासभेत मांडल्याबद्दल मा . नगरसेवक गणेश कडू यांचे इ एम पॉवर मराठ्यांचे महाकुटुंब या मराठा संघटनेने सन्मान पूर्वक आभार मानले.

मराठा भवन पनवेल अशी भव्य इमारत व्हावी ही तो श्रीं ची इच्छा ही इच्छा पूर्ण व्हावी यासाठी गणेश कडू मा.नगरसेवक पनवेल यांनी मराठा भवन व्हावे, त्यासाठी एक भूखंड अलॉट करण्यात यावा असा प्रस्ताव पनवेल मनपाच्या महासभेत मांडला. प्रशासनाने याबाबत योग्य ती माहिती घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल अशी भूमिका घेतली आहे. हा विषय महासभेत मांडला त्याबद्दल त्यांचे आभार मराठा समाजाने मानले तसेच शाल फेटा बांधून त्यांचा सन्मान करण्यात आला. भविष्यात ह्या विषयाचा दमदार पाठपुरावा करून हे कार्य पूर्ण करून घ्यावे यासाठी समाजाच्या सर्वपक्षीय नेतृत्वाने एकत्रित काम करून विषय पुढे न्यावा आणि संपूर्ण समाजाने एकदिलाने या विषयाला पाठिंबा द्यावा अशी भूमिका मांडण्यात आली. कार्यक्रमास पनवेल इ एम पॉवर चे शहाजी भोसले, सचिन लावंड, विरेन डोके, डॉ. कांचन वडगावकर - पाटील, समाधान काशीद, शिवाजी बेलोटे, अमोल शितोळे, अल्पेश माने, राहुल आंग्रे, प्रवीण तावरे आणि बहुसंख्येने बंधू भगिनी उपस्थित राहिले होते.

गुरुपौर्णिमा निमित्ताने बोर्ली ग्रामपंचायतीत दहावीतील विद्यार्थ्यांचा गुणगौरव

दै.रायगड नगरी । कोर्लई

गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून मुरुड तालुक्यातील बोर्ली ग्रामपंचायत हद्दीतील माध्यमिक शालांत परीक्षा इयत्ता दहावीत पहिल्या प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या सहा विद्यार्थ्यांचा सरपंच चेतन जावसेन मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन गुरुनां वंदन करण्यात येऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत हद्दीतील इयत्ता दहावीमधे कु. वैष्णवी जितेंद्र नाक्ती (८७ टक्के), कु तेज हेमंत डयला (८६.२० टक्के), कु गौरी विनोद राऊत (८५.४० टक्के), कु.श्रावणी जि. आग्रावकर (८५.४० टक्के). व कु. शिवानी विजय पावशे (७९.४० टक्के), कु. संजोती घासमारे (७८.२०टक्के) या पहिल्या पाच विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ, वह्या व पेन भेटवस्तू देऊन गुणगौरव करण्यात आला.

ग्रामपंचायत सरपंच चेतन जावसेन,साने गुरूजी विद्यालयाचे मुख्याध्यापक अडसरे सर, शामसुंदर गोम पाटील, शिक्षकवृंद,पालक व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

जासई हायस्कूलमध्ये वृक्षदिंडी व गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

दै.रायगड नगरी । उरण

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील जुनियर कॉलेज जासई या विद्यालयात वृक्षदिंडी व गुरुपौर्णिमा उत्सा-हात साजरी करण्यात आली. वृक्षदिंडी चे पूजन विद्यालयाचे चेअरमन अरुण शेठ जगे तसेच रघुनाथ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

मान्यवरांच्या उपस्थित वृक्षदिंडीची भक्ती भावाने मिरवणूक काढण्यात आली या वृक्षदिंडीमध्ये विद्यार्थी व सेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

तसेच विद्यालयात व्यास पौर्णिमा म्हणजेच गुरुपौर्णिमा निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे चेअरमन अरुण शेठ जगे व विद्यालयाचे प्राचार्य रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी गुरुजनां विषयी कृतज्ञता व्यक्त केली. गुरुपौर्णिमा व गुरुजनांविषयी महिती विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून सांगितली. तसेच विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक शेख सर व मयुरा ठाकूर यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व आपल्या मनोगता मधून व्यक्त केले. विद्यालयाचे प्राचार्य अरुण घाग सर यांनी भारतीय गुरुपरंपरेची महती सांगून विद्यालयातील सर्व गुरुजनांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यालयाचे चेअरमन अरुण शेठ जगे यांनीही विद्यालयातील सर्वांना या प्रसंगी शुभेच्छा दिल्या. शेवटी घरत पी.जे मॅडम यांनी मान्यवरांचे आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता झाली.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : जांबरुंग, ता.खालापूर, जि.रायगड येथील खालील व्यक्तीचे मालकीचा व ताबेकब्जातील खालील वर्णनाची जमीन आमचे अशिल १) श्री.चिंतन नरेंद्रभाई मकवाना पत्ता : १०१, खोडल धाम, भूखंड क्र.५३, सेक्टर-१९, कामोठे नोड, नवी मुंबई यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार केला आहे.

मिळकतीचे वर्णन

१) श्री.श्रीधर चिंतामण सावंत यांचा मालकीची मौजे : जांबरुंग, ता.खालापूर, जि.रायगड

गाव	सर्वे नं./हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रु.पै.
जांबरुंग	२३२	०-३६-३०	०.२८

सबब वर नमूद जमिनीवर कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळवहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण दान, बोजा, बक्षिस चार्ज लाज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत हक्क हितसंबंध स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्या पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे.

वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा हरकत, तक्रार दावा, हितसंबंध नाही असे समजून आमचे सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १३/०७/२०२२

सही/-
ॲड.करण रघुनाथ देशमुख
पत्ता : १०१, खोडाल धाम, भूखंड क्र.५३, सेक्टर १९, कामोठे, नवी मुंबई-४१०२०६

Hon'ble A.M.Mujawar Court
Adv.Rajkumar V. Jadhav
Applicant Advocate

PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE
SENIOR DIVISION, AT PANVEL
Civil M.A.No. 1051/2022
Exh : 8/D
N.D.30/08/2022

Mr.Jaiendra Ramkrishna @
ShreeKrishna Gurtu
Aged 68 year, Occupation : None
Residing at : 307/B, New Garden
View Co-op Housing Society Ltd.
Plot No.58, Prof.Almeida Road,
VTC : Bandra West S.O.
District Mumbai-400050 Applicant
V/s
None Respondent

All the public is informed by this notice inform that, Late Ramkrishna @ shreekrishna Gurtu died at Mumbai on 13/02/1982 and Mr.Jaiendra Ramkrishna @ shreekrishna Gurtu application for Heirship below Property of Late Ram Krishna Gurtu

Case No Vahal 500 A, Survey No.446, Hissa No.1, Area o-31-0 H.R. Assessed at Rs. 0.71, Village-Vahal, Tal-Panvel, Dist-Raigad, Value Rs.2,366/-

The above mention property was owned by Late Ramkrishna @ Shreekrishna Gurtu, Mr.Jaiendra Ramkrishna @ Shreekrishna Gurtu are legal heirs of Late Ram Krishna Gurtu. If any person has any objection to their rights in the above said property. He/She must appear with the quota within one month. If appropriate objection is not taken during this time.

The court will take immediate action to obtatin evidence for Mr.Jaiendra Ramkrishna @ Shreekrishna Gurtu rights, and if they prove that they are entitled as legal Heirs of Late Ramkrishna @ Shreekrishna Gurtu the Heirship certificate shall be issued in favour of Applicants.

Date 13/07/2022 On the day I gave my sign and Court Stamp.

Sd/-
Jr.Clerk
Hon Court
S.D.Panvel

Court Seal

Sd/-
Asst.Superitent.
Hon Court
S.D.Panvel

Hon'ble A.M.Mujawar Saheb
Advocate Vinod Patel
Advocate for Applicants

PUBLIC NOTICE

IN THE COURT OF HON'BLE CIVIL JUDGE
SENIOR DIVISION-PANVEL, AT PANVEL
Civil M.A.No. 1079/2022
Exh : 8/D
N.D.12/09/2022

1) Mr.Jameer Savinder singh Sandhu
Age : 32 Years,
Occupation : Service Applicant No.01
2) Mr.Navjot Savinder singh Sandhu
Age : 34 Years,
Occupation : Service Applicant No.02
3) Mrs.Kulwant Kaur Savinder singh Sandhu
Age : 56 Years,
Occupation : Housewife Applicant No.03
Above stated all applicants residing at
Jyotraj, Plot No.07 & 09, Road No.15,
Sector No.19, New Panvel (E),
Maharashtra-410206
Versus
NIL

WHEREAS the Applicants above named have file the present Application for the grant of Heirship Certificate in respect of the immovable property more particularly described in the schedule hereinunder. The said immovable property was left behind by deceased Late Mr.Savinder Singh Gurmej Singh Sandhu, who expired on 20.08.2021 at New Panvel, Taluka Panvel, Navi Mumbai, Maharashtra 410206.

AND WHEREAS if any person/s is/are having any right, title, interest and/or benefit etc., in the immovable property mentioned in the schedule hereinunder, is/are hereby invited to submit his/her/their objection in this Court within a period of 30 days from the date of publication of this Public Notice.

SCHEDULE OF THE PROPERTY

1) Flat bearing Number A-002, Gauresh Co-operative Housing Society Ltd, Plot No.12 & 14, Sector No.12,Matheran Road, New Panvel (E), Tal-Panvel, District-Raigad, Maharashtra-410206.

As such, if nothing is received within the stipulated period of 30 days from the date of publication of this Public Notice, the Application of the Applicants shall be allowed and the Heirship Certificate as prayed for shall be granted.

Given my hands and seal of this Court on this 13/07/2022

Sd/-
Jr.Clerk
Senior Division
Panvel

Court Seal

Sd/-
Asst.Superitent.
Senior Division
Panvel

संक्षिप्त...

बेवारस महिलेचा मृतदेह सापडला

दै.रायगड नगरी । पनवेल

डेली बाजार समोर सेक्टर २१, खारघर येथे एक बेवारस महिला बेशुद्ध अवस्थेत पोलिसांना सापडून आली. तिला पनवेल उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी नेले असता डॉक्टरांनी केईएम हॉस्पिटल येथे जाण्याचा सल्ला दिला. या महिलेला केईएम हॉस्पिटल मध्ये दाखल केला असता दवा उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला. खारघर पोलीस या महिलेच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत.

तरुणी बेपत्ता

दै.रायगड नगरी । पनवेल

राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक तरुणी कोठेतरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

रविना शनिवार पारधी रा. गराडा, रंग सावळा, उंची ५ फूट, चेहरा गोल, डोक्याचे केस काळे, डोळे काळे असून अंगात पिवळ्या रंगाचा टॉप व सफेद रंगाची लेगीज व पायात सफेद रंगाची स्लीपर घातलेली आहे. या तरुणी बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे, फोन - ०२२-२७४५२३३३ किंवा पो. ना.बी.ए. शिरसाट यांच्याशी सपंर्क साधावा.

इनरव्हील क्लब कर्जतच्या वतीने वृक्षारोपण

दै.रायगड नगरी । कर्जत

इनरव्हील क्लब कर्जतच्यावतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन कर्जत येथील रॉयल कॅम्प येथे करण्यात आले होते. पूजेचे पहिले मानाचे फळ 'श्रीफळ ' म्हणजेच नारळाची १० रोपे लावली. तसेच तुळशीची १० रोपे लावण्यात आली. या प्रसंगी अध्यक्षा उत्तरा वैद्य, सेक्रेटरी मोनिका बडेकर, आय एस ओ प्राची चौडीये, एडिटर ज्योत्स्ना शिंदे, सी सी शिल्पा दगडे, संजीवनी घुमरे, शीला गुप्ता, सरस्वती चौधरी, उज्वला पाटील, मधुरा मुळे आदी सदस्य उपस्थित होत्या.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

दिव्यांग्यांना सक्षम करण्यासाठी शासना बरोबर समाजाचे सहकार्य अपेक्षित : आ.अदिती तटकरे

दै.रायगड नगरी । तळा

तळा नगरपंचायत हद्दीतील दिव्यांग व्यक्तींना सन २०२१-२२ या वार्षिक वर्षातील ५% दिव्यांग निधीचे वाटप श्रीवर्धन मतदार संघाच्या लोकप्रिय आमदार कु.आदितीताई तटकरे यांच्या हस्ते तळा शहरातील गणेश मंगल कार्यालयात दिव्यांग बांधवांना धनादेश वाटप करण्यात आले. यावेळी त्यांनी अपंगांच्या वेदनेबाबत शासनासह समाजही नाते जोडण्यास त्यांना सहकार्य केल्यास ते अधिक सक्षम होतील असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

व्यासपीठावर नगराध्यक्षा अस्मिता भोरावकर, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष नाना भौड, विरोधी पक्षनेत्या नेहा पांढरकामे, दिव्यांग संघटना तळा तालुकाध्यक्ष किशोर पितळे, नगरसेवक मंगेश शिगवण, अविनाश पिसाळ, नरेश सुर्वे, रितेश मुंढे, नगरसेविका अर्चना तांबे, सारिका गवळी, माधुरी घोलप, स्वीकृत नगरसेवक प्रकाश गायकवाड, शहर अध्यक्ष महेंद्र कजबजे, भास्कर गोळे, मुख्याधिकारी चव्हाण नगरपंचायत कर्मचारी वर्ग आणि दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अदिती तटकरे पुढे म्हणाल्या की अपंग बांधव संघटित होत असल्याने यापुढे एकही अपंग राज्याच्या शासकीय योजना व लाभापासून वंचित राहणार नाही. पाच टक्के निधी वापराबाबत जनजागृती झाली आहे. तळा नगरपंचायती कडून त्याची अंमलबजावणी होत असल्याने त्यांनी आनंद व्यक्त केला दिव्यांग बांधवांची जी यादी आहे त्या यादीमध्ये कपात होता कामा नये दरवर्षी या बांधवांना लाभ मिळावा अशी भावनात्यांनी यावेळी व्यक्त केली. फंडातून निधी उपलब्ध करून देण्याचेआश्वासन त्यांनी यावेळी दिले. यामतदासंघातील आमदार म्हणून सत्ता असो या नसो तळा शहराच्या विकासासाठी नेहमीच प्रयत्नशील असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांनी प्रास्ताविक करून आमदार अदिती तटकरे यांनी नेहमीच अपंग वृद्ध निराधार महिलांना सहकार्य करण्याची भूमिका घेतली आहे. अनेक गावांमध्ये विकास निधी देऊन मतदार संघामध्ये विकासाचे स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. राज्यमंत्री असताना मतदार संघातील समस्या सांगून निधी खेचून आणण्याचा त्यांचा प्रयत्न उल्लेखनीय आहे त्यांच्या या कार्यावर श्रीवर्धन मतदार संघातील मतदारांच्या अपेक्षा वाढल्या असून आमदार आदिती तटकरे यांच्या कार्यप्रणालीवर जनता समाधानी असल्याचे पहावयास मिळत आहे.

राज्यात सत्तांतर जरी झाले असले तरी हताश होऊन न बसता जनतेला मायबाप समजून जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे प्रयत्न कसोशीने करत आहेत. जनतेने विकासासाठी पाहिलेले स्वप्न माजी मंत्री विद्यमान खा.सुनील तटकरे यांच्या नेतृत्वामध्ये आ.अदिती तटकरे पूर्ण करत आहेत त्याबद्दल जनता समाधान व्यक्त करत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. दिव्यांग संघटना तळाअध्यक्ष किशोर पितळे यांनी दिव्यांगच्या उपेक्षीत असलेल्या समस्यापुढे मांडून तालुक्यातील माझ्या बांधवासाठी नोकरीची संधी मिळावी तसेच कार्यशाळा मिळावी त्या माध्यमातून सुप्त कला गुणाना वाव मिळून समाजोपयोगी वस्तू बनवून हाताला काम मिळेल व आत्मबळ मिळून सक्षम होतील अशी मागणी करून आज पासून सहकार्य (अपंग) दिव्यांग कल्याणकारी रजि. संस्था रोहा यात सहभागी झाली आहे घोषित करून आभार मानले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्रसंचालन स्वीकृत नगरसेवक प्रकाश गायकवाड यांनी केले तर दिव्यांग संघटना तळाअध्यक्ष किशोर पितळे यांनी आभार प्रदर्शन केले.

पनवेल येथे टर्मिनस काम वेगाने ; लवकरच सोडण्यात येणार मेल-एक्स्प्रेस गाड्या

दै.रायगड नगरी । पनवेल

मध्य रेल्वे पनवेल येथे टर्मिनस आणि कळंबोलीमध्ये देखभाल-दुरुस्ती केंद्र उभारत आहे. टर्मिनसचे काम अंतिम टप्प्यात आले असून डिसेंबर २०२२ पर्यंत ते पूर्ण होईल आणि २०२३ पासून तेथून मेल-एक्स्प्रेस गाड्या सोडण्याचे नियोजन करण्यात येईल, अशी माहिती मध्य रेल्वेच्या अधिकार्यांनी दिली.

मुंबईत मोठ्या प्रमाणात येणार्या-जाणार्या मेल-एक्स्प्रेस गाड्या, प्रवाशांची वाढती गर्दी आणि लोकलच्या वेळापत्रकावर होणारा परिणाम टाळण्यासाठी मुंबई - कोकणदरम्यान आणखी १० किंवा त्यापेक्षा जास्त मेल-एक्स्प्रेस सोडण्याची तयारी मध्य रेल्वे करीत आहे. याशिवाय मध्य रेल्वेवरील सध्याच्या दोन टर्मिनसवरील भार हलका होईल आणि लोकलचे वेळापत्रकही सुरळीत होईल, असा विश्वास अधिकार्यांनी व्यक्त केला.मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात मेल-एक्स्प्रेस गाड्यांनी प्रवेश केल्यानंतर सीएसएमटी, लोकमान्य टिळक टर्मिनस, दादर येथे थांबा आहे. तसेच येथून गाड्याही सोडण्यात येतात. अनेक गाड्या दादर, एलटीटीपर्यंत येताच रिकाम्या होतात. त्यामुळे सीएसएमटीपर्यंत जाणार्या गाड्यांमध्ये प्रवाशांची संख्या फारच कमी असते. गेल्या काही वर्षांत तर या तीनही स्थानकात लांब पल्ल्याच्या गाड्यांचा भार वाढला आहे. दिवसाला २०० हून अधिक मेल-एक्स्प्रेस फेर्यांची ये-जा सुरू असते. परिणामी, मेल-एक्स्प्रेसला प्राधान्य द्यायचे की लोकलना असा प्रश्न निर्माण होतो. परिणामी, वेळापत्रक विस्कळीत होते. त्यामुळे मध्य रेल्वेने पनवेल येथे टर्मिनस उभारण्याचा निर्णय घेतला. या प्रकल्पाला २०१६-१७ मध्ये मंजुरी मिळताच टर्मिनसच्या कामाला सुरुवात करण्यात आली. आतापर्यंत टर्मिनसचे सरासरी ७६ टक्के भौतिक काम पूर्ण झाले आहे. पनवेल येथे टर्मिनसबरोबरच कळंबोली येथे मेल-एक्स्प्रेस गाड्यांची देखभाल, दुरुस्तीसाठी केंद्रही उभारण्यात येणार आहे. त्यामुळे देखभालीसाठी दक्षिण मुंबईतील वाडीबंदर किंवा माझगाव यार्डपर्यंत जाण्याची गरज भासणार नाही, अशी माहिती एका वरिष्ठ अधिकार्याने दिली.दरम्यान, टर्मिनसच्या आजूबाजूची जमीन सिडकोच्या अखत्यारित आहे. यासंदर्भात सिडकोसोबत करण्यात येत असलेला करार अंतिम टप्प्यात आहे. काही कामांसाठी सिडको १.९२ हेक्टर जमीन विनामूल्य सुपूर्द करणार आहे. कळंबोली येथे देखभाल शेड आणि स्थानक इमारतीचे कामही पूर्ण झालेले आहे.

पनवेल येथे नवीन फलाटांची ६० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. प्रवासी भुयारी मार्गाचे ७५ टक्के काम झाले असून अन्य कामेही अंतिम टप्प्यात आहेत. नवीन टर्मिनसमधून २४ डब्यांच्या गाड्या सोडण्याचा विचार आहे. या टर्मिनसमुळे मुंबई-कोकणदरम्यान आणखी १० नवीन गाड्या धावतील. कोकण रेल्वेचे विद्युतीकरण पूर्ण झाले असून आता पनवेल टर्मिनस कार्यान्वित होताच मेल, एक्स्प्रेस गाड्यांची संख्या वाढेल.

असे असेल टर्मिनस

मेल, एक्स्प्रेस गाड्या सुटणार

२४ आणि २६ डब्यांच्या गाड्यांसाठी फलाट पादचारी पूल, १५०० चौरस मीटर नवीन इमारतीसह अन्य सुविधा

नागोठण्यातील श्री स्वामी समर्थ मठात गुरुपौर्णिमा साजरी

दै.रायगड नगरी । नागोठणे

गेली दोन वर्षे कोरोनाच्या जागतिक महामारीमुळे नागोठण्यातील खडकआळी भागातील श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास केंद्रात गुरुपौर्णिमा मोठ्या स्वरूपात साजरी करण्यात आली नव्हती. मात्र आता कोरोनाचे निर्बंध उठविण्यात आले असल्याने येथील श्री स्वामी समर्थ महाराजांच्या मठात गुरुपौर्णिमा बुधवारी (दि.१३) सकाळपासूनच्या विविध धार्मिक कार्यक्रमांनी मोठ्या भक्तिमय आणि उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. केंद्रातील गुरुपौर्णिमेची सुरुवात सकाळी सहा वाजता पूजा विधीने करण्यात आली. त्यानंतर भाविकांसाठी दर्शन सुरु करण्यात आले. सकाळी ८.३० व १०.३० वाजता तसेच सायंकाळी ६.३० वाजता श्री स्वामी समर्थ महाराजांची आरती घेण्यात आली. या आरतीला महिला व भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. याशिवाय श्री स्वामी समर्थ महाराजांच्या या आध्यात्मिक केंद्रात सकाळपासून रात्री पर्यंत दर्शन व सप्तशृंगी पाठाचे वाचन भक्तगणांकडून करण्यात आले. खडक आळीतील अध्यात्मिक विकास केंद्रातील गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी होण्यासाठी खडकआळी ग्रामस्थ व सर्व स्वामी सेवेक-यांनी मेहनत घेतली.

श्री साई नारायण बाबा आश्रम यांच्या मार्फत ८३ वा शास्त्रयुक्त कन्यादान सोहळा संपन्न

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल येथील श्री साई नारायण बाबा आश्रम व श्री भगवती साई संस्थान यांच्या वतीने ८३ वा शास्त्रयुक्त कन्यादान सोहळा साई भक्तांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

सद्गुरू श्री साई नारायण बाबा यांच्या आशीर्वादाने ८३ वा शास्त्रयुक्त कन्यादान सो-हळा श्री साई बाबा मंदिर स्टेशन रोड पनवेल येथे आयोजित करण्यात आला होता, अंत्यत शास्त्रयुक्त पद्दतीने हा सोहळा संपन्न झाला असून या ठिकाणी या कन्यादान सोहळ्या निमित्त येणारा सर्व खर्च श्री साई नारायण बाबा आश्रम व श्री भगवती साई संस्थान यांच्या वतीने करण्यात आला होता. यावेळी वधू - वरांना आवश्यक असणाऱ्या संसारपयोगी वस्तू व इतर साहित्य यावेळी संस्थेच्या वतीने देण्यात आले.

अष्टविनायक तीर्थ क्षेत्रातील पाली बस स्थानक गैरसोईंचे आगार ; खड्डे, पाणी, चिखल, दुर्गंधी

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

महाराष्ट्रातील अष्टविनायकाचे प्रख्यात धार्मिक स्थळ , व सुधागड तालुक्यातील मुख्यालयाचे ठिकाण असलेल्या पालीतील बसस्थानकाचे नूतनीकरण मागील २ वर्षांपासून ठप्प आहे. तसेच स्थानकाला खड्डे, पाणी, चिखल, दुर्गंधी आदी विविध समस्यांनी वेढले आहे. परिणामी येथील प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत आहे. बसस्थानकाला अच्छे दिन कधी येणार?असा सवाल जनतेतून विचारला जातोय.

सव्वा वर्षांपूर्वी पाली बस स्थानकाची जुनी धोकादायक इमारत तोडण्यात आली आहे. त्यावेळी स्थानक आवारात तात्पुरत्या स्वरूपाची निवारा शेड बांधण्यात आली.

मात्र त्यानंतर एक वर्षे उलटून गेली तरी आजतागायत परिवहन महामंडळ अथवा कंत्राटदाराकडून तेथे कोणत्याही स्वरूपाचे काम सुरू करण्यात आलेले नाही. जुन्या इमारतीचे डेब्रिज व राडारोडा स्थानकात तसाच पडला आहे. स्थानकातील नाल्याचा स्लॅब तुटलेला आहे. त्यामुळे बस येजा करण्यास अडथळा येतो. स्थानक आवारात पालीतील नाले व गटारांतील सांडपाणी येते. त्यामुळे येथे खूप दुर्गंधी पसरली आहे. स्थानकात मोठाले खड्डे पडले आहेत. परिणामी सांडपाणी व पावसाचे पाणी खड्ड्यांत तुंबते.

यामुळे येथून मार्ग काढणे किंवा एसटीमध्ये चढणे व उतरणे प्रवाशांसाठी दिव्य ठरत आहे. वृद्ध व महिलांचे तर प्रचंड हाल होत आहेत. शिवाय तात्पुरती बांधण्यात आलेली प्रवासी शेड छोटी असल्याने मुसळधार पाऊस आल्यास प्रवाश्यांना उभे राहायला सुद्धा जागा होत नाही. त्यांची खूप गैरसोय होते. प्रवाश्यांना पिण्यासाठी पाणी देखील नाही. अशा प्रकारे पाली बसस्थानकाची दुरवस्था झाली आहे. यामुळे स्थानिक नागरिक व प्रवाश्यांमध्ये प्रचंड संताप आहे.

अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयात परिचारिका व आरोग्य कर्मचाऱ्यांना मिळाले आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

दै.रायगड नगरी । अलिबाग

अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयातील अधिकारी-कर्मचारी, शिकावू परिचारिका यांच्यासाठी आपत्ती व्यवस्थापन व सुरक्षाविषयक शिबीर काल (दि.१२ जुलै २०२२) रोजी अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयात संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.प्रमोद गवई, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.गजानन गुंजकर, आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षक जयपाल पाटील हे व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. आपत्ती व्यवस्थापन व सुरक्षाविषयक व्याख्याते श्री.जयपाल पाटील यांचे स्वागत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने यांनी उपस्थितांना प्रत्येकाने आपत्ती कशा प्रकारे येते, यापासून आपली व आपल्या कुटुंबाची काळजी कशी घ्यावी याबाबतचे प्रशिक्षण व्याख्याते जयपाल पाटील यांच्याकडून घेवून आपत्तीकाळात आपली व आपल्या कुटुंबाची काळजी घ्यावी, असे आवाहन केले. यावेळी डॉ.गवई म्हणाले की, वैद्यकीय क्षेत्रात काम करणारे आपण सर्वजण आपत्तीग्रस्तांची सेवा करतो, मात्र आपत्तीकाळात स्वत:ची व कुटुंबियांची सुरक्षा कशा प्रकारे करावी, याची माहिती जयपाल पाटील देतात. ते देत असलेली माहिती अतिशय महत्त्वाची असून त्यांच्या ज्ञानाचा लाभ आपण घ्यावा अन् ही माहिती इतरांनाही द्यावी.

यावेळी जयपाल पाटील यांनी घरातील गॅस, विजेची साधने सुरक्षितरित्या कशी हाताळावीत, मोबाईलचे धोके आणि सुरक्षा, विशेषत: महिला वर्गासाठी कोणताही आ-पत्तीजनक प्रसंग उद्भवल्यास महाराष्ट्र पोलिसांच्या ११२ तर अपघात झाल्यास १०८ रुग्णवाहिका व प्रसूतीसाठी १०२ रुग्णवाहिका या हेल्पलाईन क्रमांकाचा वापर आदी विषयांबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रात्यक्षिक म्हणून ११२ या हेल्पलाईन क्रमांकावर फोन करण्यात आला असता अलिबाग पोलीस ठाण्यातून महिला पोलीस हवालदार शारदा भगत, पोलीस हव-ालदार सुनिल फड, प्रकाश हंबीर हे प्रशिक्षण वर्गाच्या ठिकाणी तात्काळ दाखल झाले. या कार्यशाळेचा लाभ जिल्हा सामान्य रुग्णालयातील परिचारिका व आरोग्य कर्मचाऱ्यांनी घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यास मेट्रन श्रीमती साळवी, थळे, मोकल, पाटील, बावरे, जोशी, राऊत, कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेट्रन नेहा चव्हाण यांनी केले तर आभार प्रदर्शन मेट्रन सिमा पाटील यांनी केले.

कर्जत नगरपरिषद क्षेत्रात नगराध्यक्षा व मुख्याधिकारी यांनी केली नदी पाहणी

दै.रायगड नगरी । कर्जत

तीन चार दिवस पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे कर्जत शहरातून वाहणाऱ्या उल्हासनदीच्या पाण्याची पातळी वाढली होती,

नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, मुख्याधिकारी सुरेखा भणगे, नगरसेविका प्राची डेरवणकर, कर्जत नगर परिषद कार्यालयीन अधिक्षक जितेंद्र गोसावी, नगर अभियंता मनिष गायकवाड, नगर रचना लक्ष्मण माने, अभियंता सारिका कुंभार, सुदाम म्हसे, सुनिल लाड यांनी बामचा मळा, मुद्रे आदी ठिकाणी जावून नदीच्या पाण्याच्या वाढलेल्या पातळीची पाहणी केली व त्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षते च्या सूचना दिल्या.